महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम

## जिल्हा सेतू समिती, वाशिम

जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत, काटा रोड, वाशिम

---

जा./क्र.अका/सेतू/DCPUपदभरतीदरपत्रक/१०१८/२०१७-१८ दिनांक -३०/११/२०१७

प्रति,
संबंधित व्यावसायिक,
.....................................................
.....................................................

विषय –जिल्हा सेतू समिती अंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष, वाशिम करिता कंत्राटी पदावर नियुक्तीदेण्यासाठी Softwere चे काम करणाऱ्या व्यावसायीकाकडून सीलबंद दरपत्रक मागविण्याबाबत...

संदर्भ -१ मा .जिल्हाधिकारी यांचे जिल्हा बाल संरक्षण कक्षातील पदभरती बाबतचे मंजूर टिपणी व जाहिरातीचे प्रारूप.
२ मा .जिल्हाधिकारी यांचे जिल्हा बाल संरक्षण कक्षातील पदभरती जिल्हा सेतू समिती मार्फत भरण्याचे आदेश दिनांक १६/१०/२०१७

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते कि ,महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या एकात्मिक बाल संरक्षण योजने अंतर्गत प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हा बाल संरक्षण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे .सदर कक्षांअंतर्गत कंत्राटी पदावर नियुक्ती करणे करिता पात्र उमेदवाराकडून पद्धतीने अर्ज Online बोलावण्यासाठी Softwere चे काम करणाऱ्या व्यावसायीका कडून दरपत्रक बोलवण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष जिल्हा बाल संरक्षण कक्ष, वाशिम यांनी मान्यता दिली आहे.

सबब सदर Online प्रक्रिया पूर्ण करणे करिता Softwere चे काम करणाऱ्या व्यावसायीकाकडून कडून खालिल अटी व शर्ती च्या अधीन राहून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

अटी व शर्ती –

१. Online फॉर्म मागविणे व त्याची स्क्रुटिनी Excel Sheet मध्ये करुन पुन्हा वेब साईटवर प्रसिद्ध करणे.
२. फॉर्म बोलावण्याचा कालावधी कमीत कमी १० दिवस राहील.
३. तांत्रिक अडचण आल्यास जबाबदारी आपली राहील.
४. प्रसिद्ध दिनांकापासून ५ दिवसाचे आत दरपत्रक सादर करावे लागेल.
५. online येणारे फॉर्म चे स्टेटस दररोज कळावे अशी व्यवस्था करण्यात यावी.
६. दरपत्रक उघडल्यानंतर ३ दिवसाचे आत आज्ञावली विकसित करून द्यावी लागेल.
७. आज्ञावली विकसित करण्यासंबधात अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, वाशिम यांचेशी संपर्क साधावा.

निवासी उपजिल्हाधिकारी तथा,
सदस्य सचिव वाशिम सेतू समिती
(जिल्हा सेतू समिती)
वाशिम

प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर –

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा बाल संरक्षण कक्ष, वाशिम
मा. विभागीय उपआयुक्त महिला व बाल विकास अमरावती विभाग अमरावती
मा. कार्यक्रम व्यवस्थापक (बाल संरक्षण) महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था, पुणे

Scanned by CamScanner